महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
'१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/वाचन प्रेरणा दिन/२०२२/ ८८६४
दिनांक : 12 OCT 2022

## परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय : माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोंबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेबाबत.**

**संदर्भ : १. महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई, मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्रमांक : वाप्रेदि -२०२२/प्र.क्र.७५/भाषा-३, दिनांक : २६ सप्टेंबर, २०२२.**
**२. महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई, मराठी भाषा विभाग शासन पत्र क्रमांक : वाप्रेदि -२०२२/प्र.क्र.७५/भाषा-३, दिनांक : २७ सप्टेंबर, २०२२.**
**३. महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन पत्र क्रमांक : संकीर्ण -२०२२/प्र.क्र.१२१/आस्था-२, दिनांक : १० ऑक्टोंबर, २०२२.**

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग यांनी निर्गमित केलेले शासन परिपत्रक सोबत जोडण्यात आलेले आहे. माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोंबर हा जन्मदिवस **"वाचन प्रेरणा दिन"** म्हणून साजरा करण्यात येतो. या निर्णयास अनुसरुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दीगत करण्याच्या दृष्टीने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थाप्रमूखांना सूचित करण्यात येते की, मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर धोरण विचारात घेऊन वरील सूचना तसेच संदर्भाधीन दिनांक २६.०९.२०२२ च्या शासन परिपत्रकातील सूचना कार्यक्रम आयोजित करतांना सर्व संस्थाप्रमूखांनी विचारात घ्याव्यात.

या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, खाजगी विनाअनुदानित संस्थाप्रमूखांना कळविण्यात येते की, पत्रासोबत **गुगल फॉर्मच्या सोबत दिलेल्या लिंकव्दारे** https://forms.gle/QfJa९pbXk४४hbVc४६ आपल्या संस्थेची अचूक **माहिती दिनांक २०.१०.२०२२ रोजीपर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी,** माहिती सादर न केलेल्या संस्थांवर नियमाप्रमाणे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : १ प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: वाप्रेदि-२०२२/प्र.क्र.७५/भाषा-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २६ सप्टेंबर, २०२२

वाचा :-

१) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०१५/प्र.क्र.८९/२०१५/भाषा-३, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५.

२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. मभावा-२०२०/प्र.क्र.९८/भाषा-२, दि. २४ जून, २०२२

शासन परिपत्रक :-

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या निर्णयास अनुसरुन संदर्भाधीन शासन परिपत्रक क्र.१ च्या अनुषंगाने "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रम साजरा करण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत दरवर्षी सूचना देण्यात येतात.

२. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. या धोरणाची व्यापकता वाढविण्यासाठी मराठी भाषेसंदर्भात राबवण्यात येणाऱ्या विद्यमान व विस्तारीत उपक्रमांना संदर्भाधीन दि. २४ जून, २०२२ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी विविध प्रकारचे संदेश, व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामुहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन इत्यादी कार्यक्रमासाठी मराठी भाषा विभाग व अधिनस्त कार्यालय यांना कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विस्तारीत उपक्रमातंर्गत मराठी प्रचार-प्रसार साठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबात सुचित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयानुसार संबंधित आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

तसेच सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी वाचन प्रेरणा निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करावयाचे आहे.

३. या वर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने नेमके कोणते कार्यक्रम आयोजित करण्यात यावे या दृष्टीने खालीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात येत आहेत :-

१. सांस्कृतिक कार्यक्रम/चर्चासत्रे/प्रशिक्षण इत्यादी माध्यमातून दरवर्षी वाचन संस्कृती वाढीस लागण्याच्या विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. त्याप्रमाणे यावर्षी सुद्धा समाजमाध्यमे/प्रत्यक्षरित्या (ऑनलाईन/ऑफलाईन )पद्धतीने कार्यक्रम करण्यात यावे जेणेकरुन कार्यक्रमाची व्याप्ती वाढून वाचन प्रेरणा दिनाचा संदेश सगळीकडे एकाचवेळी प्रसारीत करता येईल. यावर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून, "अमृत महोत्सव भारतीय स्वातंत्र्याचा, उत्सव राष्ट्रभक्तीपर पुस्तकांच्या वाचनाचा" ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करुन राष्ट्रभक्तीपर पुस्तकांचे/साहित्याचे वाचन, राष्ट्रभक्तीपर पुस्तके भेट देणे, देशाच्या स्वातंत्र चळवळी सहभाग घेतलेल्या थोर व्यक्तींना त्यांच्या कार्यावर पुस्तकांच्या अभिवाचनातून आदरांजली अर्पित करणे त्यांच्या चरित्रपर पुस्तकांचे प्रदर्शन, वाचक मेळावे, परिसंवाद अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

२. "वाचन संस्कृती" जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक भेट देऊन प्रोत्साहन द्यावे.

३. ललित साहित्य यापुरते कार्यक्रम मर्यादित न ठेवता विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, पर्यावरण, आरोग्य, संगणक, संकेतस्थळं, अवकाश विज्ञान इत्यादी काळानुरुप विषयांचा देखील समावेश कार्यक्रमात करण्यात यावा.

४. "वाचन संस्कृती" वाढीस लागावी तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरूण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयांवरील तसेच अशा स्वरूपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.
१) अनुवादलेखन २) व्यावसायिक लेखन ३) पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया ४) ई-बुक
५) स्व-प्रकाशन ६) युनिकोडचा वापर ७) ऑनलाईन पुस्तक विक्री ८)लेखक प्रकाशन करार
९) संहिता लेखन १०) विश्वकोशाबाबत माहिती कार्यशाळा ११) शॉर्ट फिल्म/डॉक्युमेंटरी लेखन

५. व्हॉटसॲप (WhatsApp), इंटरनेट (Internet), फेसबुक(Facebook), ट्विटर (Twitter) अशा प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दींगत होईल/वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.

६. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्व उपलब्ध माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचकांना पाठवावे.

तसेच सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी वाचन प्रेरणा निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करावयाचे आहे.

३. या वर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने नेमके कोणते कार्यक्रम आयोजित करण्यात यावे या दृष्टीने खालीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात येत आहेत :-

१. सांस्कृतिक कार्यक्रम/चर्चासत्रे/प्रशिक्षण इत्यादी माध्यमातून दरवर्षी वाचन संस्कृती वाढीस लागण्याच्या विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. त्याप्रमाणे यावर्षी सुद्धा समाजमाध्यमे/प्रत्यक्षरित्या (ऑनलाईन/ऑफलाईन )पद्धतीने कार्यक्रम करण्यात यावे जेणेकरुन कार्यक्रमाची व्याप्ती वाढून वाचन प्रेरणा दिनाचा संदेश सगळीकडे एकाचवेळी प्रसारीत करता येईल. यावर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून, "अमृत महोत्सव भारतीय स्वातंत्र्याचा, उत्सव राष्ट्रभक्तीपर पुस्तकांच्या वाचनाचा" ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करुन राष्ट्रभक्तीपर पुस्तकांचे/साहित्याचे वाचन, राष्ट्रभक्तीपर पुस्तके भेट देणे, देशाच्या स्वातंत्र चळवळी सहभाग घेतलेल्या थोर व्यक्तींना त्यांच्या कार्यावर पुस्तकांच्या अभिवाचनातून आदरांजली अर्पित करणे त्यांच्या चरित्रपर पुस्तकांचे प्रदर्शन, वाचक मेळावे, परिसंवाद अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

२. "वाचन संस्कृती" जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक भेट देऊन प्रोत्साहन द्यावे.

३. ललित साहित्य यापुरते कार्यक्रम मर्यादित न ठेवता विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, पर्यावरण, आरोग्य, संगणक, संकेतस्थळं, अवकाश विज्ञान इत्यादी काळानुरुप विषयांचा देखील समावेश कार्यक्रमात करण्यात यावा.

४. "वाचन संस्कृती" वाढीस लागावी तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरूण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयांवरील तसेच अशा स्वरूपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१) अनुवादलेखन २) व्यावसायिक लेखन ३) पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया ४) ई-बुक ५) स्व-प्रकाशन ६) युनिकोडचा वापर ७) ऑनलाईन पुस्तक विक्री ८)लेखक प्रकाशन करार ९) संहिता लेखन १०) विश्वकोशाबाबत माहिती कार्यशाळा ११) शॉर्ट फिल्म/डॉक्युमेंटरी लेखन

५. व्हॉटसॲप (WhatsApp), इंटरनेट (Internet), फेसबुक(Facebook), ट्विटर (Twitter) अशा प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दींगत होईल/वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.

६. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्व उपलब्ध माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचकांना पाठवावे.

७. सर्व संस्थांनी सोशल मीडियावर "मराठी वाचन कट्टा ' निर्मिती करावी.

८. सर्व संस्थांनी आपल्या स्तरावर मराठी आभासी (digital)/प्रत्यक्ष साहित्य संमेलनाचे आयोजन करावे.

९. विकीपीडीया सारख्या माध्यमावर मराठीत जास्तीत जास्त लेखन व्हावे याकरीता यासंबधीच्या कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात.

१०. वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्याने मराठी प्रचार/प्रसार/वाचन संस्कृतीच्या विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

११. मराठी अभिजात दर्जाबाबत सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

१२. वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन संस्कृती वृद्धींगत होण्यासाठी विविध प्रकारचे संदेश, व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामुहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन यांचे आयोजन करण्यात यावे.

१३. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या वाचन संस्कृती विषयक कार्यशाळांचे वेळापत्रक जाहिर करून त्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करावेत.

१४. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी मराठीचा प्रचार/प्रसार प्रभावीपणे कसा करता येईल या विषयावरील तज्ञांच्या कार्यशाळा आयोजित कराव्यात.

१५. वाचन संस्कृती वृद्धींगत होण्यासाठी, मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

१६. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करावे.

१७. सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर कार्यक्रम आयोजित करावे.

१८. वाचन संस्कृती वृद्धींगत होण्यासाठी तसेच न्यायव्यवहार, शासन प्रशासन, प्रसार माध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी

भाषेचा वापर यांबाबत जागरूकता वाढविण्यासाठी व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे तसेच आधुनिक माध्यमांचा वापर करून कार्यक्रमांचे आयोजन करावे.

१९. आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करावे.

२०. वाचन संस्कृती वृद्धींगत होण्यासाठी मराठी भाषा/साहित्य/कोश वाङ्‌मय या विषयांवर ऑनलाईन व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात यावे.

२१. वाचन संस्कृती वृद्धींगत होण्यासाठी, मराठीच्या प्रचार/प्रसारासाठी अभिनव कल्पना सादर करून त्याप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

२२. वाचन संस्कृती वृद्धींगत होण्यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/सत्कार करणे.

२३. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

२४. भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळाबद्दलची माहिती शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारीत करण्याची जबाबदारी चारही क्षेत्रीय कार्यालयांची राहील.

२५. वरील कार्यक्रम सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी जिल्हाधिकारी/महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मदत घ्यावी.

| अ.क्र. | जिल्हाधिकारी | साहित्य संस्था |
|---|---|---|
| १. | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर. | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे |
| २. | जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद |
| ३. | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली | विदर्भ साहित्य संघ, नागपूर |
| ४. | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर, | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी |
| ५. | कोल्हापूर | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर |
| ६. | मुंबई शहर | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. |

सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच अ.क्र.२५ येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

२६. ग्रंथालये, महाविद्यालये, तंत्रमहाविद्यालये, पदविका संस्था तसेच अखत्यारीतील अन्य संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सुचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संबंधितांना द्याव्यात.

२७. सांस्कृतिक व पर्यटन विभागाअंतर्गत सांस्कृतिक संचालनालयाच्या अखत्यारीतील संस्थांना उदा. फिल्मसिटी गोरेगाव, अखिल भारतीय नाट्य महामंडळ अशा स्वरुपाच्या संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना सांस्कृतिक व पर्यटन विभागाने संबंधितांना द्याव्यात.

२८. शालेय शिक्षण विभागाअंतर्गत शाळा या वाचन संस्कृती वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे माध्यम आहे ही बाब विचारात घेता वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीत्यातील संबंधित संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना द्याव्यात.

२९. महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना अखिल भारतीय साहित्य महामंडळ तथा सर्व साहित्य संस्थांना द्याव्यात.

३०. नगर विकास विभागाअंतर्गत महापालिका/नगरपालिका वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी तथा मराठीच्या प्रचार प्रसारासाठी त्यांच्या अखत्यारीत्यातील संबंधित संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना द्याव्यात.

३१. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील संबंधितांचे सहकार्य घेऊन हा सोहळा पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सहभागी करुन घ्यावे. तसेच सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत संबंधितांना आवश्यक ते निर्देश द्यावेत.

३२. विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या कक्षेत येणारे विषय तसेच, महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहास या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्याविषयाच्या बहुविध वाङ्मय योजनांच्या परिपूर्तीसाठी चालना देणे, मदत करणे तसेच, ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरुप व आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यातील अद्ययावत प्रगतीची माहिती देणारी, मूलभूत ज्ञान देणारी पुस्तके व अभिजात ग्रंथाची भाषांतरे स्वस्त किंमतीत उपलब्ध करुन देणे साहित्य संस्कृती मंडळाचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार मंडळाने कालानुरुप ललित साहित्य बरोबरच ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरुप व आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान तसेच अन्य नविन विषयांचा आढावा घेऊन त्याचा अंतर्भाव संस्थेच्या पुस्तक प्रकाशनात करावा.

३३. राज्य मराठी विकास संस्थेने वाचन संस्कृती वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने नवीन उपक्रम सुरु करुन त्याच्या वर्षभराच्या वेळापत्रकानुसार सदर उपक्रम सुरु करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा.

३४. विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाच्या नोंदी अद्यावत करण्याच्या दृष्टीने निरंतर प्रशिक्षण कार्यक्रम तथा नोंदीची संख्या वाढविण्यासाठी कार्यक्रम निश्चित करावा व अंमलबजावणीचा अहवाल शासनास सादर करावा.

३५. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर धोरण विचारात घेऊन वरील सूचना तसेच संदर्भाधीन दि. २४ जुन, २०२२ च्या शासन निर्णयातील सूचना कार्यक्रम आयोजित करतांना सर्व मंत्रालयीन विभाग तथा मंत्रालयीन विभागअंतर्गत सर्व संबंधित विभागांनी तसेच अन्य सर्व संस्थांनी, मंडळांनी, महामंडळांनी, सार्वजनिक उपक्रम, बँका यांनी विचारात घ्याव्यात.

३६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०९२६१७०१५५८३३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MILIND BHAGWAN GAWADE

Digitally signed by MILIND BHAGWAN GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], pseudonym=[illegible], serialNumber=[illegible], cn=MILIND BHAGWAN GAWADE
Date: 2022.09.26 17:12:08 +05'30'

( मिलिंद गवादे )

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव/विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव, मुंबई,
६. मा.मुख्य सचिव/सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने),
९. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१०. अध्यक्ष, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
११. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन, मुंबई,
१२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३. सर्व मंत्रालयीन विभाग,
१४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मुद्या क्र. २६ च्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी
१५. सांस्कृतिक व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मुद्या क्र. २७ च्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी
१६. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मुद्या क्र. ३० च्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई,
२१. महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर,

# महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email: do.asthahte-mh@gov.in

क्र: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१२१/आस्था-२
४३१ विस्तार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२
दिनांक: १० ऑक्टोबर, २०२२.

प्रति,

१) सर्व संचालक (उच्च/तंत्र/कला/ग्रंथालय)
संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे/मुंबई.

२) कुलसचिव (सर्व अकृषी विद्यापीठे)

विषय:- वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम साजरा करणेबाबत...
संदर्भ:- सहसचिव, मराठी भाषा विभाग, क्र.वाप्रेदि-२०२२/प्र.क्र.७५/भाषा-३,
दि.२७.०९.२०२२ रोजीचे पत्र व दिनांक २६.०९.२०२२ रोजीचा शासन निर्णय.

महोदय,

सोबत जोडलेल्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुषंगाने "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रम साजरा करण्यासाठी आपल्या अधिनस्त सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, विद्यापीठे, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांना विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(मो. गं. आरसेवाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

(दूरध्वनी क्र.०२२-२२७९४१६९) Email ID : aishvarya.govekar@nic.in

क्रमांक-वाप्रेदि-२०२२/प्र.क्र.७५/भाषा-३ दिनांक -२७.९.२०२२

प्रति,

श्री. विकासचंद्र रस्तोगी, प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रम साजरा करणेबाबत.

संदर्भ :- १. मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०२२/प्र.क्र.७५/भाषा-३, दि.२६.९.२०२२
२. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभावा-२०२०/प्र.क्र.९८/भाषा-२, दि.२४.६.२०२२

महोदय /महोदया,

मराठी भाषा विभागाचे 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करावयाच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रक कृपया पहावे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. त्यानुसार माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो.

संदर्भ क्र.१ येथे नमूद केलेल्या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रम साजरा करण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभागांना आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यानुसार आपला विभाग आणि विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांना देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात यावे, त्याअनुषंगाने संदर्भ क्र.२ येथे नमूद शासन निर्णयान्वये 'वाचन प्रेरणा दिन' या उपक्रमाकरिता प्रत्येक विभागासाठी रु.१०,०००/- निधीची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

आपला,

(मिलिंद भ.गवादे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- संग्रही-(भाषा-३)